महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/तेवीस दिनांक १२ ऑगस्ट, २०२१

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:-राज्यसेवा मुख्य परीक्षा २०१९ - पदांचे पसंतीक्रम निवडीबाबत**

राज्यसेवा मुख्य परीक्षा २०१९ च्या लेखी परीक्षेचा निकाल दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी व सुधारित निकाल दिनांक ६ ऑगस्ट, २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर दोन्ही निकालास अनुसरुन पदांचे पसंतीक्रम सादर करण्याकरीता वेबलिंक सुरु करण्यात येत असून पदांचे पसंतीक्रम निवडीसंदर्भात उमेदवारांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे:-

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील Post Preference या लिंकवर क्लिक करावे.

(२) उपलब्ध होणा-या परीक्षांच्या यादीमधून 'राज्यसेवा मुख्य परीक्षा २०१९' ची निवड करावी.

(३) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करुन सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करुन लॉगीन करावे.

(३) उपलब्ध होणा-या नमुन्यामध्ये पदांचे पसंतीक्रम नमूद करण्यात यावेत.

२. राज्यसेवा मुख्य परीक्षा २०१९ च्या दोन्ही निकालास अनुसरुन यापूर्वी मुलाखतीस उपस्थित असलेल्या व दिनांक ६ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या सुधारित निकालाद्वारे मुलाखतीस अपात्र न ठरलेल्या तसेच नव्याने मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना पदांचे पसंतीक्रम निवडता येतील.

३. पदांचे पसंतीक्रम निवडीसाठीची वेबलिंक **दिनांक १९ ऑगस्ट, २०२१ रोजी २३:५९ वाजेपर्यंत** सुरु राहील.

४. विहित कालावधीनंतर पसंतीक्रम सादर करण्याकरीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही. तसेच, विहित पध्दतीने व विहित कालावधीमध्ये पदांचा पसंतीक्रम सादर न करणा-या उमेदवारांचा अंतिम शिफारशीसाठी विचार करणे शक्य होणार नाही.

५. उपरोक्त विहित कार्यपध्दतीनुसार पदांचे पसंतीक्रम सादर करताना कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा १८००-२६७३-८८९ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर संपर्क साधता येईल.

ठिकाण:-मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग